५६९

उपसा सिंचन योजना कार्यान्वित करणे / योजनांचे आराखडे तयार करणे इत्यादिबाबत विविध मंडळांची जबाबदारी.

महाराष्ट्र शासन,
पाटबंधारे विभाग,
शासन निर्णय क्रमांक – संकीर्ण-१०९५/[२५०/९५]/पा.प्र.[प्र.]
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १६ डिसेंबर १९९५.

**पूर्वपिठीका :**

मोठ्या पाटबंधारे प्रकल्पांतर्गत उपसा सिंचन योजना कार्यान्वित करण्याची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत आहे. गेल्या काही वर्षांत मोठ्या पाटबंधारे प्रकल्पांच्या जलाशयातून तसेच कालव्यांमधून शेतीला पाणी पुरवठा करून सिंचन वाढविण्यासाठी ब-याचशा मोठ्या उपसा सिंचन योजनांना मान्यता देण्यात आलेली आहे. उपसा सिंचन योजना कार्यान्वित करण्याची बाब बरीच किचकट असते. उपसा सिंचन योजनेंतर्गत पंपगृहे, मोठ्या व्यासाचे पाईप, मोठ्या अश्वशक्तीचे पंप्स तसेच ट्रान्सफॉर्मर्स व कालव्याद्वारे शेतीस पाणी पुरवठा करण्यासाठी बांधकामे या सर्व उप घटकांचा प्रामुख्याने समावेश असतो. उपसा सिंचन योजनेचा आढावा आराखडा तयार करून योजना कार्यान्वित करणे व पूर्णत्वास नेणे यासंबंधे प्रामुख्याने स्थापत्य विभाग, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, विद्युत मंडळ, यांत्रिकी मंडळ इत्यादींचा सहभाग घ्यावा लागतो. या सर्व योजनांमध्ये सुसूत्रता आणण्याच्या दृष्टीने विविध मंडळांची जबाबदारी निश्चित करणे व आराखड्यास पूर्ण स्वरूप देणे ही बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

२. वरील सर्व बाबींचा विचार करून उपसा सिंचन योजना कार्यान्वित करण्यासाठी संकल्पचित्रे व विनिर्देश तयार करण्याचे काम करण्यासंदर्भात शासनाने आता खालील निर्णय घेतलेले आहेत.

१] मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेने उपसा सिंचन योजनांची उद्वाही पंपाची क्षमता, पंपाचे प्रकार, प्रत्येक पंपाची अश्वशक्ती इ. तपशिल प्रस्तावित करावा. या तपशिलास यांत्रिकी यंत्रणेने अंतिम स्वरूप द्यावे. तसेच उद्वाही नलिकेचा व्यास, जाडी इ. गोष्टींना अंतिम स्वरूप देण्याबाबत मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेने कार्यवाही करावी.

२] संबंधित यांत्रिकी मंडळ / विभाग यांनी पंपगृहाचा आराखडा तयार करावा.

३] योजनेचा सर्वसाधारण आराखडा मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांनी तयार करावा.

४] संकल्पचित्रासाठी वापरावयाचे वजन / तपशिल या विषयी दृढीकरण करण्याबाबत संबंधित यांत्रिकी मंडळ / विभागाने कार्यवाही करावी.

५. पंपगृहाच्या स्थापत्य कामाची सविस्तर संकल्पचित्रे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेने तयार करावीत.

६. उद्धाही नलिकांच्या विविध भागांचे पंपगृहाच्या आतील भागांबाबतच्या तपशिलास यांत्रिकी संघटनेने अंतिम स्वरूप द्यावे आणि पंपगृहाच्या बाहेरील भागांबाबतच्या तपशिलास मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेने अंतिम स्वरूप द्यावे, तसेच जलाघात विश्लेषण व प्रतिजलाघात उपाययोजना याबाबतीत [Surge analysis and Anti surge devices] ———— संबंधित यांत्रिकी संघटनेने / विभागाने मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांच्या सल्ल्याने कार्यवाही करावी.

३. उपसा सिंचन योजनांचा आराखडा त्वरित तयार करणे व त्यास अंतिम स्वरूप देण्यासाठी एक उप समिती नेमण्याचाही शासनाने निर्णय घेतला आहे. या उप समितीत खालील अधिकारी राहतील.

१. अधीक्षक अभियंता, [स्थापत्य] मंडळ, — [प्रकल्पाशी संबंधित ]
२. अधीक्षक अभियंता, संकल्पचित्र मंडळ, नाशिक,
३. अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ [तारे],
४. अधीक्षक अभियंता [विद्युत] विद्युत मंडळ — [प्रकल्पाशी संबंधित ]

४. उपसा सिंचन योजनेस प्रशासकीय मान्यता मिळताच या उप समितीने प्राथमिक बैठक घेऊन योजनेच्या आराखड्यास अंतिम स्वरूप देण्यासाठी संबंधित स्थायी समितीची मान्यता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[signature]
[ आ. अं. जवळेकर ]
शासनाचे उप सचिव.

प्रति.
१. सर्व मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग.
२. मुख्य अभियंता, [यांत्रिकी] पाटबंधारे विभाग, नाशिक.
३. मुख्य अभियंता व संचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक.
४. अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ, उत्तर, पुणे.
५. अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ [तारे] पुणे.
६. अधीक्षक अभियंता, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक.
७. सर्व अधीक्षक अभियंता, पाटबंधारे विभाग.
८. सो.पृ. [प्र.] निवडधारिका, पाटबंधारे विभागातील सर्व तांत्रिक अधिकारी व तांत्रिक कार्यालये.

(क) बैठकीत ठरलेल्या कामकाजासह व आवश्यक त्या सूचनांसह अहवाल शासनाच्या बैठकीच्या दिनांकानंतर १५ दिवसात सादर केला जाईल.

४. सुकाणू समितीच्या बैठकीत जरी विविध मुद्यांच्या प्रश्नावर चर्चा होऊन काही निर्णय घेण्यात आले तरीही अशा निर्णयांवर शासनाची अंतिम मंजुरी मिळाल्याशिवाय अंमलबजावणी करता येणार नाही.

५. समितीत समाविष्ट असलेल्या सदस्यांना नियमाप्रमाणे दैनंदिन भत्ते, प्रवास भत्ते व इतर आनुषंगिक खर्च अनुज्ञेय राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(नि. द. दलाल)
शासनाचे उप सचिव

प्रतिलिपी :

स्वीय सहायक, मा. मंत्री (पाटबंधारे)/ मा. राज्यमंत्री (पाटबंधारे)
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
सचिव, पाटबंधारे विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
सचिव, उर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
मुख्य अभियंता (प्रकल्प) व सह सचिव, पाटबंधारे विभाग, मंत्रालय, मुंबई
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग.
मुख्य अभियंता व संचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, (मेरी) नाशिक
मुख्य अभियंता, यांत्रिकी विभाग, नाशिक
मुख्य अभियंता, जल विद्युत, मुंबई
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, प्रकाशगड, वांद्रे (पू), मुंबई ५१
मुख्य अभियंता, (सर्वेक्षण व नियोजन), म. रा. वि. मं. प्रकाशगड, वांद्रे (पू), मुंबई ५१
मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, कोल्हापूर.
अधीक्षक अभियंता, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक (वि. यु.)/मा. ल./द. ल.
सर्व अधीक्षक अभियंता.
पाटबंधारे विभाग (अर्थसंकल्प शाखा), मंत्रालय, मुंबई ३२
सर्व विभागीय आयुक्त
सर्व तांत्रिक अधिकारी/तांत्रिक कार्यासने, पा. वि. मंत्रालय/आ. प्र.-२ संग्रहार्थ